


# अंबाबाई चा उदो उदो...





## असे आहे यावर्षीचे शारदीय नवरात्रीचे ९ रंग

| | |
|---|---|
| नवरात्रीचा दिवस पहिला दिवस | - पिवळा |
| नवरात्रीचा दुसरा दिवस | - हिरवा |
| नवरात्रीचा तिसरा दिवस | - राखाडी |
| नवरात्रीचा चौथा दिवस | - संत्रा |
| नवरात्रीचा पाचवा दिवस | - पांढरा |
| नवरात्रीचा सहावा दिवस | - लाल |
| नवरात्रीचा सातवा दिवस | - रॉयल ब्लू |
| नवरात्रीचा आठवा दिवस | गुलाबी |
| नवरात्रीचा नववा दिवस | - जांभळा |

## नवरात्रौत्सवाला उत्साहात सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.3 )** - विद्युतरोषणाईने उजळलेली मंदिरे... तोरण, रंगबिरंगी पताके आणि विविधरंगी फुलांची आकर्षक सजावट... धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल... अशा चैतन्यपूर्ण वातावरणात नवरात्रोत्सवाला गुरुवारी (दि. 3) सुरुवात झाली. मंदिरांसह मंडळे, सोसायट्या आणि घरोघरीही उत्सवाचा आनंद बहरला आहे. जिल्ह्याचे दैवत अंबा आणि एकविरा मंदिरासह शहर आणि ग्रामीण भागातील विविध



मंदिरांमध्ये सकाळी विधिवत आणि पारंपरिक पद्धतीने घटस्थापना करण्यात आली, तसेच घरोघरीही विधिवत पद्धतीने घटस्थापना झाली. आदिशक्तीच्या आगमनानिमित्त सगळीकडे उत्साह पाहायला मिळाला. अंबादेवी मंदिरात पहाटेपासूनच भक्तांनी दर्शनाकरिता रांगा लावत, अंबाबाईचा उदो उदोज असे जयकारे लावले.

देवीच्या मंदिरांमध्ये सकाळच्या पहिल्या टप्प्यात घटस्थापना करण्यात आली. त्यानंतर भजन-कीर्तनासह वैविध्यपूर्ण धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. अंबा आणि एकविरा देवी मंदिरे नेहमीप्रमाणे दिवसभर दर्शनासाठी खुली राहणार आहेत. मंडळांच्या ठिकाणीही दुर्गादेवीचे दणक्यात स्वागत करण्यात आले. अश्विन प्रतिपदेचा दिवस धार्मिक सोहळ्याने न्हाहूण निघाला. मंडळासह सोसायट्यांमध्येही उत्सवाचे चैतन्य पाहायला मिळत आहे. घरोघरी पारंपरिक मराठमोळ्या वेशभूषेत नटलेल्या महिला-युवती घटस्थापना केली. उत्सवानिमित्त उत्साहाचा रंग सगळीकडे बहरला आहे. पंचपक्वान्नांचा बेतही घरोघरी आखण्यात आला होता. महिला-युवती उपवास करणार असून, घटस्थापनेसाठी लागणारे नैवेद्याचे पदार्थही त्या तयार करणार आहेत. यानिमित्त घरोघरी खास सजावटही करण्यात आली. हर्षोल्हासात आणि आनंदात आदिशक्तीचे स्वागत करण्यात आहे.

### शहरात 65 ठिकाणी गरबा

गरबाशिवाय नवदुर्गा उत्सव अपूर्ण आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून गरब्यात सहभागी होण्यासाठी ठिकठिकाणी पूर्व प्रशिक्षण दिले जात होते. विशेषत- तरुण पिढीमध्ये गरब्याबद्दल प्रचंड उत्साह आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा गरबा जास्त ठिकाणी खेळला जाणार असून, शहरात एकूण 65 ठिकाणी गरबाचे आयोजन करण्यात आले आहे.


पहिल्याच दिवशी ठिकठिकाणी दांडिया-गरबाचे कार्यक्रम, भक्तिगीतांचे कार्यक्रम, विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

# अस्वलाच्या हल्ल्यात गुराखी गंभीर

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.3 )** - मेळघाटात वन्यप्राण्यांकडून होणार्या हल्ल्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. अस्वलीने एका गुराख्यावर हल्ला केल्याची आणखी एक घटना चिखलदरा तालुक्यातील चौबिता गावा घडली. अस्वलाने हल्ला केलेल्या गुराख्याचे नाव गुन्नू रोना बेठेकर (55) असून त्याच्या पायावर जखम आहे.

या हल्ल्यात गुराखी गंभीर जखमी झाला असून 1 ऑक्टोंबर रोजी दुपारच्या सुमारास गुरे चालत असताना चौबिता



बीटमध्ये वन खंड क्रमांक 358 मध्ये अचानक अस्वलाने या गुराख्यावर हल्ला केला. या हल्ल्यामध्ये गुराखी जखमी झाला असून रात्री उशिरा आठ वाजेपर्यंत त्याला जंगलातून चुरणी ग्रामीण रूग्णालयामध्ये आणण्यात आले. याठिकाणी पुढील उपचारासाठी अमरावतीच्या जिल्हा सामान्य रूग्णालयात रेफर करण्यात आले.

> अस्वलाने गुराख्यावर हल्ला केला असून त्यात गुराखी जखमी झाला आहे. त्याला प्राथमिक उपचारासाठी चुरणी येथे आणण्यात आले होते. त्यानंतर त्याला जिल्हा सामान्य रूग्णालय येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले. शासकीय नियमानुसार त्याला मदत देण्यात येईल.
>
> **-मसूद खान, वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक जारिदा.**


## अमरावती महानगरपालिका, अमरावती

**( बांधकाम विभाग-शहर अभियंता )**

**निविदा सुचना**

अमनपा/बां.शि./श.अ./नि.सु.क्र. ४०/२४/ दि. ०१/१०/२०२४

अमरावती महानगरपालिका शहर अभियंता, बांधकाम विभाग मधील मनपा निधी अंतर्गत करावयाच्या कामाचा निविदा प्रसिद्ध जा.क्र. ४०/२४ दि. ०१/१०/२०२४ नुसार महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर सविस्तर निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**खालील प्रमाणे ई-निविदा सुचना कार्यक्रम दिलेला आहे.**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी | दि. ०१/१०/२०२४ |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरवात दिनांक | दि. ०१/१०/२०२४ दु. १६.०० वाजेपासून |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि. ०८/१०/२०२४ दु. १६.०० वाजेपर्यंत १२ वा. |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक (Technical) | दि. ०९/१०/२०२४ दु. १६.०० वा. (शक्य झाल्यास) १२ वा. |
| (Financial) ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ Mail व SMS द्वारे कळविण्यात येईल. | |

ऑनलाईन भरण्याबद्दल सविस्तर माहिती तसेच निविदा अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहावी.

**( रविंद्र पवार )**
**शहर अभियंता**
**महानगरपालिका, अमरावती**






आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# राज्यपालांनी साधला विविध घटकांशी संवाद

**नागरी सेवा परीक्षांसाठी प्रशिक्षण, खेळाडूंना तिरंदाजीचे उत्कृष्ट प्रशिक्षण व साहित्य उपलब्ध करून द्यावे!**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )** – राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज जिल्हा दौऱ्यात शासकीय विश्रामगृह येथे विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकार्यांशी जिल्ह्यातील विविध विकास विषयक प्रश्नांवर चर्चा केली. तसेच उद्योग, संस्कृती, पर्यटन, साहित्य तसेच विविध समाज घटकांशी संवाद साधून त्यांच्या विकासविषयक अपेक्षा, समस्या व संकल्पना जाणून घेतल्या.



यावेळी आमदार प्रवीण पोटे -पाटील, माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख , हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे पद्मश्री प्रभाकर वैद्य , साहित्यिक वसंत आबाजी डाहाके , मेळघाट डॉ. रवींद्र कोल्हे , विभागीय आयुक्त डॉ. निधि पांडेय, गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलिंद बाराहाते , जिल्हाधिकारी सौरभ कटियार ,मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, जिल्हा पोलीस अधीक्षक नवीनचंद्र रेड्डी, विभागीय मुख्य वन संरक्षक जयोती बॅनर्जी आदी उपस्थित होते. राज्यपाल राधाकृष्णन यांच्या समोर मान्यवर व्यक्तींनी विदर्भातील शेतकरी आत्महत्या, सिंचन अनुशेष, विदर्भातील प्रशासकीय अधिकारी यांचा अनुशेष, क्रीडाविषयक पायाभूत सुविधा, %उद्योगांसाठी पोषक वातावरण %नागरी सेवा परीक्षांसाठी दर्जेदार प्रशिक्षण यासारखे विषय मांडले. राज्यपाल राधाकृष्णन यांनी सर्व गटांचे म्हणणे ऐकून घेत सर्व मागण्या व विकास संकल्पनांबाबत लक्ष घालण्याबाबत आश्वस्त केले. जिल्हाधिकार्यांनी जिल्ह्यातील विविध योजनांचे सादरीकरण केले. या बैठकीला प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बैठकीत जिल्हयाचा ऐतिहासिक-सांस्कृतिक, भौगोलिक स्थिती व उदयोग व जिल्हा विकास आराखडयानुसार विकासाचे नियोजनाचे सादरीकरण केले.

### कामगारांच्या संघटनांही सहकार्य करणे आवश्यक

मेळघाटात पुरेशा प्रमाणात पाऊस पडतो. परंतु पावसाचे पाणी थांबविण्यासाठी जल संधारणाची कामे करण्यात यावी. बांध आणि इतर कामे करण्यासाठी स्वतंत्र प्रकल्प निर्माण करण्यात यावा. टेक्सटाईल पार्कमधील उद्योजकांनी जिल्हा आणि पोलीस प्रशासन संपूर्ण सहकार्य करीत आहे. त्यासोबतच कामगारांच्या संघटनांही सहकार्य करणे आवश्यक आहे. यामुळे उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी पोषक वातावरण तयार होईल. याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा. पोलिस प्रशासनानेही याबाबत तक्रार आल्यास योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी. याबाबत राजकीय पक्षांशीही चर्चा करण्यात यावी. यामुळे उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल.

### खेळाडूंनी व्यक्त केल्या अपेक्षा

खेळाडूंनी खेळामध्ये जास्त लक्ष द्यावे लागत आहे. त्यामुळे अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे शक्य होत नसल्याने अल्प प्रक्रियेत शासकीय नोकरी मिळण्याची प्रक्रिया करण्यात यावी. अशी अपेक्षा खेळाडूंनी व्यक्त केली. याबाबत राज्यपालांना शासनाच्या ध्येय धोरणानुसार याबाबत कार्यवाही होईल असे आश्वस्त केले. अमरावती येथे तिरंदाजी खेळामध्ये उत्तम पायाभूत सुविधा आहेत. येथे या क्रिडा प्रकारबाबत आंतरराष्टीय सुविधा निर्माण होवू शकतील . यासाठी उत्तम प्रशिक्षक तसेच क्रीडा साहित्य मिळावे . तसेच उत्तम प्रशासकीय अधिकारी निर्माण व्हावे यासाठी नागरी प्रशिक्षण संस्था निर्माण करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रभाकर वैद्य यांच्या यावेळी राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# त्या घटनेची पोलिसात तक्रार

**■ वीज प्रवाहीत शेत कंपाउंडमूळे तरुण दगाविण्याचे प्रकरण ■**

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.3 )**– तालुक्याअंतर्गत सातनूर येथे एका शेतकऱ्याने आपल्या शेतातील कंपाउंडमध्ये (संरक्षण जाळी) जीवंत वीज प्रवाह सोडला. या कंपाउंडला स्पर्श झाल्याने वीजेचा धक्का लागून 17 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला होता. ही घटना सोमवार (दि.39)ला सायंकाळी 5 वाजताच्या दरम्यान उघडकीस आली होती. या घटनेची मृतकाच्या आईने लागून असलेल्या मध्यप्रदेशातील मुलताई पोलीस स्टेशनला या शेतमालकाविरुध्द आपली तक्रार नोंदविली आहे.



प्राप्त माहितीनुसार , सौरभ गणेश भाजीखाये (वय 17 वर्ष रा. सातनूर) असे मृतकाचे नाव आहे. घटनेच्या दिवशी मृतक हा शेतामध्ये काही कामानिमित्त गेला होता. बाजूच्या शेतकऱ्याने शेताच्या कंपाऊंडला करंट लावल्याची माहिती मृतकाला नसल्यामुळे सदर घटना घडली असावी. असा कयास लावल्या जात आहे. घटनेची माहिती गावातीलच मिथुन उईके व साहेबराव उईके यांनी मृतकाच्या आई-वडिलांना दिली. त्यामुळे मृतकाचे आई-वडील व नातेवाईक तसेच गावातील नागरिकांनी सुद्धा घटनास्थळावर एकच धाव घेतली. ज्या शेतामध्ये मृतकाला वीजेचा धक्का लागला होता, तेथून त्याचा मृतदेह बेपत्ता होता. काही वेळाने त्या ठिकाणीहून त्याचा मृतदेह पाच ते सहा शेता पलीकडे आढळली. कुटुंबांला शंका आल्याने त्यांनी घटनेची माहिती शेंदुरजनाघाट पोलीसात दिली. त्यानंतर पोलीस घटनास्थळावर दाखल झाले. परंतु ज्या शेतामध्ये तो मृतदेह होता. ते शेत मध्यप्रदेशातील मुलताई पोलीस स्टेशन हद्दीत येत असल्यामुळे सदर प्रकरण शेंदुरजनाघाट पोलिसांनी मुलताई पोलीस स्टेशनला हस्तांतरित केले. मुलताई पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी एन.एस.ठाकूर व मोहम्मद सलमान यांनी घटनेचा पंचनामा केला. नेमके या तरुणाचा मृत्यू कशामुळे झाला व कोणत्या ठिकाणी झाला, याची चौकशी मुलताई पोलीस करीत आहे. मृतकाच्या शवविच्छेदनानंतरच सौरभचा मृत्यू कशामुळे झाला व कुठे झाला हे कळेल.

# 'अनंगाचा स्पर्श' कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा उद्या

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )**– कवयित्री नयना नितीन द्वारा लिखित अनंगाचा स्पर्श या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा शनिवार, दिनांक 05 ऑक्टोबर 2024 रोजी सकाळी 10~30 वाजता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार केंद्र सभागृह या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

या प्रकाशन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध कवी बबन सराडकर असणार आहेत. मराठीतील सुप्रसिद्ध कवयित्री व ख्यातनाम समीक्षक प्रभा गणोरकर यांच्या हस्ते या कवितासंग्रहाचे प्रकाशन होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ लेखिका प्रतिमा इंगोले, ज्येष्ठ कवी अशोक थोरात, सुप्रसिद्ध कलावंत मिर्झा रफी अहमद बेग देखील उपस्थित असणार आहे. या कवितासंग्रहाचे प्रकाशन अक्षरशिल्प प्रकाशन, अमरावती द्वारा करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाला साहित्य प्रेमी, अभ्यासक, समीक्षक,संशोधक आणि कलावंत व इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कवितासंग्रहाचे प्रकाशक विकास राऊत यांनी केले आहे.

# जिल्हा बॅंकेला धोरणात्मक निर्णय घेण्यावर बंदी

**उच्च न्यायालयाचे आदेश**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.3 )** – उपविधी दुरूस्तीबाबत येत्या 9 ऑक्टोबरला विभागीय सहनिबधकांकडे सुनावणी होणार आहे.त्यामुळे या कार्यालयाच्या पुढील निर्णयापर्यंत बँकेने कोणताही धोरणात्मक निर्णय घेवु नये असे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहे.त्यामुळे आता बँकेला विभागीय सहनिबधकांच्या निर्णयाची प्रतिक्षा लागली आहे.




विभागीय सहनिबंधक कार्यालयाने 13 ऑक्टोबरच्या 2023 आदेशान्वे बँकेच्या उपविधीमध्ये दुरुस्ती प्रस्तावित केली होती. सदर आदेशाविरुद्ध बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड व इतर 12 संचालकांनी सहकारमंर्त्यांकडे अपील दाखल करून या आदेशाला आव्हान दिले होते. त्यामुळे सहकारमंर्त्यांनी 3 सप्टेंबर रोजीच्या आदेशान्वे उपविधी दुरुस्ती बाबतचा आदेश रद्द करून प्रकरण पुन्हा विभागीय सहनिबंधक यांच्या कार्यालयाने उपविधी दुरुस्तीबाबत फेर चौकशी करावी असे आदेशित केले. दरम्यान सहकार मंत्री यांच्या आदेशाविरुद्ध बँकेतर्फे उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल करण्यात आली.

संबंधित संचालक मंडळातील सदस्यांना व बँकेला उपविधी बाबत फेर निर्णय घेण्याच्या प्रकरणात 9 ऑक्टोबर रोजी विभागीय सहनिबंधक यांनी सुनावणी लावली व या सुनावणीला दोन्ही पक्षाने उपस्थित राहण्याचे आदेश देत तोपर्यंत बँकेतील नोकर भरती, उपविधीची पुनश्च दुरुस्ती, बँकेच्या आर्थिक निर्णयासंबंधी तसेच सभासद भरती व सभासद काढणे आदी धोरणात्मक निर्णय घेवुन नये असे आदेश बॅकेला दिले आहे. बँकेचे दैनंदिन कामकाज जुन्या उपविधीप्रमाणे करण्याची मुभा बँकेला दिली आहे. सदर प्रकरणी न्यायालयात हरिभाऊ मोहोड व 12 संचालकांच्या बाजूने वकील ॲड.हरीश डांगरे, ॲड.निलेश गावंडे यांनी युक्तिवाद केला.

# अधिश वैराळे झळकला देशाच्या राजधानीत...!

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )** – देशाची राजधानी दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या विविध राष्ट्रीय खेळ स्पर्धांमध्ये ॲकेडमिक हाईट्स पब्लिक स्कूल मूर्तिजापूरचा इयत्ता पाचवीत शिकणारा अधिश अमित वैराळे याने आपल्या बुद्धीबळाचा वापर करून घवघवीत यश संपादन करत कांस्य पदकास गवसनी घालून देशाच्या राजधानीत झळकला आहे.



सदरच्या स्पर्धेमध्ये देशातील जवळपास 70 शाळांच्या 1200 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता. मूर्तिजापूरसारख्या छोट्या शहरातून दिल्ली येथे जाऊन महाराष्ट्राची मान उंचावण्याचे काम अूकेडमिक हाईट्सच्या विद्यार्थ्यांनी केले आहे. जिद्द व चिकाटी असली की आपण काहीही करू शकतो याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे ॲकेडमी हाईट्सचे विद्यार्थी आहेत. तसेच शाळेने घेतलेले परिश्रमही वाखाणण्याजोगे आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये सामान्य ज्ञानावर आधारित स्पर्धेमध्ये अधिश वैराळे कांस्य पदक मिळविले. या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचे कौतुक सर्वच स्तरातून केले जात असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अधिश आपल्या यशाचे श्रेय वडील प्रा.डॉ.अमित वैराळे, आई तहसीलदार शिल्पा बोबडे यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक ,शाळेचे अध्यक्ष अशोक दर्यानी, संचालिका रिया दर्यानी, राम दर्यानी, अनिल दर्यानी, दिपाली देशमुख,अबिन सी. राज यांना देत आहे.


## नगर परिषद दर्यापूर, जिल्हा अमरावती

जा.क्र./विद्युत/निविदा सुचना/जाहिरात ३९३८/२०२४/ प्रसिद्धी दिनांक ०४/१०/२०२४

मा. मुख्याधिकारी दर्यापूर नगरपरिषद यांचे कडून सन २०२४-२०२५ या न.प. निधी अंतर्गत माझी वसुंधरा ५.० अंतर्गत न.प. क्षेत्रातील नगरपरिषद कार्यालय, न.प. शाळा, इतर शासकीय विभाग इत्यादीचे एनर्जी ऑडिट करणे या कामाकरीता दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. या निविदेच्या पूर्ण अटी व शर्ती, अर्हता तसेच सविस्तर निविदा सुचना न.प. विद्युत विभागात कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध आहे.

स्वाक्षरी
मुख्याधिकारी
नगरपरिषद दर्यापूर


# कंत्राटात अनियमितता, तरीही धावतील 1 कोटींचा सायकली ?

**कंत्राट रद्द करण्याची मागणी | प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद ?**

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.3 )** – अमरावती जिल्हा परिषद मधील शिक्षण विभाग मध्ये ग्रामविकास आणि पंचायत राज विभागाच्या 1 कोटी रुपयांचा 1800 सायकली पुरविण्याबाबत निविदा काढण्यात आली होती. एकच निविदा तीनवेळा काढण्यात आल्याने ही निविदा प्रक्रीया राबविणारे अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. जवळच्या ठेकेदाराला लाभ पोहोचविण्याकरता हे द्रविडी प्राणायम करण्यात आल्याची चर्चा शिक्षण विभागात जोमाने सुरू होती, असे असताना याप्रकरणी तक्रार आलेली असतानाही कुठलीही चौकशी न करता कंत्राट देण्यात आला असल्याची माहिती आहे.






कंत्राटात अनियमितता असल्याचा संशय असतानाही 1 कोटींचा सायकली धावणार असल्याचे दिसत आहे.

अमरावती येथील शहजाद खान यांनी दिनांक 13 सप्टेंबर 2024 ला या निविदा संदर्भात जिल्हा परिषद मुख्याधिकारी यांच्या कडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीअनुसार निविदा क्रमांक GEM/ 2024/B/ 5290089 यामध्ये न्यु शर्मा ब्रदर्स यांना एलवन करून वर्क ऑर्डर देण्यात आली. तत्पूर्वी निविदा क्रमांक तश्वरू2024 /B/5152681 यामध्ये न्यू शर्मा ब्रदर्स यांना अपात्र ठरवले होते. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी शासकीय नियमांना डावलून हेतू परस्पर आणि मनमर्जीप्रमाणे न्यू शर्मा ब्रदर्स यांनाच काम कसे देता येईल त्याचप्रमाणे निविदेमध्ये सुधारणा करुन सदर कंत्राटदाराला लाभ पोहोचविण्यात आला. न्यू शर्मा ब्रदर्स यांनाच एलवन करून वर्क ऑर्डर दिली. त्यामुळे यांची निष्पक्ष चौकशी करून कारवाई ची मागणी तक्राराने केली होती.

### तक्रारीवर कारवाई नाही ?

दि.13 सप्टेंबर 2024 ला तक्रार करून देखील 10 दिवस उलटूनही कुठलीच कारवाई करण्यात आली नाही. पुन्हा 10 दिवसांनी 23 सप्टेंबर 2024 ला तक्रार संदर्भात स्मरण पत्र दिले, मात्र अधिकाऱ्यांनी यावर चुप्पी साधत उत्तर दिले नाही. त्यामूळे या कंत्राटामागे नेमकी कोणती महाशक्ती अधिकाऱ्यांच्या पाठीशी आहे हे पाहणेही औत्सुक्याचे ठरेल.

### आधीचे अपात्र, रातोरात पात्र कसे ?

तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार एका निविदेमध्ये ज्यांना या कामाची निविदा वर्क ऑर्डर मिळले ते पहिल्या निविदेत अपात्र झाले. मग दुसऱ्या निविदेत रातोरात कसे काय पात्र झाले ? याचा खुलासा प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांने करणे गरजेचे होते. परंतू त्यांनी तसा खुलासा केला नाही, त्यामूळे त्यांची भूमिका संशयास्पद वाटत आहे.1 कोटी रुपयांच्या या 1800 सायकल वाटपाची 3 वेळा निविदा प्रक्रिया कशाला आणि कोणाच्या सांगण्यावरून करण्यात आली, याचा सुद्धा शोध घेणे आवश्यक आहे. तसेच ज्यांना ही वर्क ऑर्डर देण्यात आली, ते यासाठी खरचं कायदेशीर योग्य आहे का ते तपासणे गरजेचे झाले आहे.


GOVERNMENT OF MAHARASHTRA
AMRAVATI ELECTRICAL DIVISION,
PUBLIC WORKS DEPARTMENT, AMRAVATI.
E-TENDER NOTICE NO. 43 FOR 2024-2025

Online tenders in B-1 form are invited by Executive Engineer, Amravati (Electrical) Division, Public Works Division, Amravati on behalf of Governor of Maharashtra from qualified bidders for the following works under E-Tender procedure

| Sr. No | Name of work | Amount Put to Tender | E.M.D. |
| --- | --- | --- | --- |
| 1 | Estimate No. 510/EE/AMT/ 2024-25, Providing Street Light Pole on Divider from Mauli Chowk to Parsoda Stop at Chandur Bazar, Walgaon, Kamunja, Kund Sarjapur, Kawatha, Nimbhora, Uttamsara, Walaki, Belora to SH-6 (SH-298) 0/0 to 2/500 at CHANDUR BAZAR, Dist. Amravati. | 4186999/- | 41900/- |
| 2 | Estimate No. 512/EE/AMT/ 2024-25, Providing Street Light Pole on Divider from Jaistambh Chowk to Mauli Chowk at Chandur Bazar, Walgaon, Kamunja, Kund Sarjapur, Kawatha, Nimbhora, Uttamsara, Walaki, Belora to SH-6 (SH-298) 0/0 to 2/500 at CHANDUR BAZAR, Dist. Amravati. | 4186999/- | 41900/- |

Tender form, conditions of contract, specifications and contract drawings can be downloaded from the eTendering portal of Public Works Department, Government of Maharashtra i.e. https://mahatenders.gov.in after entering the details, payment of Rs. 590/- (Including GST) (Rupees Five Hundred Ninety Only) (Including GST) should be paid online using payment gateway. The fees of tender document will be non refundable. Further information regarding the work can be obtained from the above office.

: TENDER SCHEDULE :

| | | |
| --- | --- | --- |
| Cost of Tender Form | : | Rs. 590/- + (Including GST) |
| Period of download of bidding document | : | From 04.10.2024 Time 10.00 Hours<br>To 11.10.2024 Time 18.55 Hours |
| Pre bid conference date, time and venue | | Not Applicable |
| Receipt of online EMD, Tender Document fees, to be paid online only via Payment Gateway mode Only. | : | Document Tender Fee and EMD to be paid via online mode only. Through bidders own account. |
| Place time and date of opening technical bids | : | Office of the Executive Engineer, P.W. (Electrical) Division, Amravati.<br>Date 14.10.2024 Time 11.00 to 18.55 Hours |
| Place, Time and date of opening financial bids | : | Office of the Executive Engineer, P.W. (Electrical) Division, Amravati.<br>Date 14.10.2024 Time 11.00 to 18.55 Hours |
| Performance Security Deposit | : | If the Lowest Tenderer has quoted below the Scheduled cost by more than 1%, he should submit Performance Security Deposite in the form of Bank Guarantee/Demand Draft/F.D.R. in the office of The Executive Engineer, Public Works (Electrical) Division Amravati within 8 days from the opening of Envelop No. 2 as per Govt. Circular No. CAT/2017/ C.No.08/Bld.-2, Dt. 26/11/2018. |
| Registration class of Contractor | : | Contractor Registered in Appropriate Class & Having MOUs as Stated in NIT |

Lr. No./Ex. En./(Ele.)/Amt./T.C./ 2711 /2024
Office of the Executive Engineer (Electrical) Division
Amravati P.W. (Electrical) Division,
P.W.D. Compound, Camp, Amravati.
Email : elamaravati.ee@mahapwd.gov.in
Date : 01/10/2024.

Executive Engineer
Amravati Electrical Division
Public Works Division
Amravati

विमाका/अम./जाही./577